C/357

संशोधन संचालनालय
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला ४४४१०४ (महा)

डॉ. डी. एम. पंचभाई
संशोधन संचालक

फोन- (का) ०७२४-२२५८४१९
फॅक्स- ०७२४-२२५८४१९
इ-मेल- director_res@pdkv.ac.in

जा.क्र./DR/TF/1856 /२०२६

दि. 27/10/२०२६

परिपत्रक

संदर्भ: मा. कुलगुरू कार्यालय मंजूर नस्ती क्र.V/ 207०/ २०२६ दि. 23/10 /२०२६.

उपरोक्त संदर्भीय मंजूर नस्ती मध्यवर्ती संशोधन केंद्र मध्यवर्ती व प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर, डॉ. पंदेकृवि, अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामातील शेती निगडीत, फळबाग संबंधित व भांडार विभागातील विविध कामे कंत्राट पद्धतीने करण्याकरिता ई-निविदा प्रक्रिया राबवून सन २०२६-२७ व २०२७-२८ या वर्षा करिता खाली दिलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून मा. कुलगुरू, डॉ. पंदेकृवि, अकोला यांचे मान्यतेने भावदर्शक तुलनात्मक तक्त्यामधील सर्वात कमी दर निश्चित करण्यात आलेले असून सर्वात कमी दराला मान्यतेनुसार सदरचे कामे मे. इनोत्रो मल्टी सर्व्हिसेस, अकोला (मो.न.९१३०००३०८९), मे. गोपाल सेक्युरीटी गार्ड सर्व्हिसेस, यवतमाळ (मो. न. ९६२३७७९९०३), मे. निवृत्ती कृपा किराणा अँड फार्म डेवलपमेंट, अकोला (मो. न. ९०७५५२९०६६), मे. जय गजानन संस्था, अकोला (मो.न.९०११८८१८१२), मे. शुभम इलेक्ट्रीकॅल्स, अकोला (मो.नं. ९७६३५९२०५४), मे. विजय इलेक्ट्रीकॅल्स, अकोला (मो.नं. ८८८८४८८८५४), मे. समर्थ लेबर सप्लायर्स अँड कॉन्ट्रॅक्टर्स, अकोला (मो.नं. ९७३०१८९६५५), मे. धर्माजी घरडे बहूदेशिय संस्था, अकोला (मो.न.९२८४०५२५८१), मे. जय संताजी बहूदेशिय संस्था, अकोला (मो.न.८००७५०७९५०), मे. कृषि पदवीधारक बहूदेशिय संस्था, अकोला (मो.न.९७६५३३११२४४), मे. माऊली मल्टीपर्पज, अकोला (मो.न.८९८३२१८००८), मे. आद्या इंटरप्राइजेस, अकोला (मो.न.८८०५७१०७०१), मे. नाना एंटरप्रायजेस अँड मल्टी सर्व्हिसेस, अकोला (मो.न.८८०५४७६४७५), मे. श्री सुशिक्षित बेरोजगार बहूदेशिय संस्था, अकोला (मो.न.९८६०१९२०५०), मे. संकल्प बहुउद्देशिया संस्था, अकोला (मो. न. ९७६७२७४२०६), मे. के पी एंटरप्रायजेस, अकोला (मो.न.९५५२६४९८९१), मे. श्रेयस एंटरप्रायजेस प्रा. लि., अकोला (मो.नं. ८६०५३८९७४८), मे. जागर फार्मर्स प्रोडुसर कंपनी लि., अकोला (मो.न.९८२२६९७०१०), मे. गुरुदत्त माऊली सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था, अकोला (मो.न.८३०८०१०३९३), मे. हिरवी श्रुष्टी फार्मर प्रोडुसर कंपनी लि., अकोला (मो.न.८४५९२७९९३०), मे. सचिन मल्टी सर्व्हिसेस प्रा. लि., छत्रपती संभाजी नगर (मो. न. ८९५६७८८८८९), मे. शांताई कला क्रीडा व बहूदेशिय शिक्षण संस्था, अकोला (मो.न.८४२१५४५४४२), मे. श्री स्वामी समर्थ अभिनव शेती विविध टेक्नीकल संगोपन सहकारी संस्था, अकोला (मो.न.९५२७५२५११२) व मे. महात्मा फुले सुशिक्षित बेरोजगार बहूदेशिय सेवा, अकोला (मो.न.९८५००७६२३२) वरीलप्रमाणे दर्शविण्यात आलेल्या कंत्राटदारांकडून करण्यात यावे. तसेच सदर कामे परिपत्रकातील नमूद कंत्राटदारांनी करण्यास नकार दिल्यास हीच कामे दुसऱ्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून परिपत्रकातील दिलेल्या अटी व शर्ती मध्ये नमूद असलेल्या दस्ताएवजाची तपासणी/शहानिशा करून नमूद दरानुसारच पुढील कामे करण्यात यावी. सदर दर हे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अंतर्गत असणाऱ्या कार्यक्षेत्रामधील विदर्भातील मसकें, मप्राप्र, सर्व संशोधन केंद्रांकरिता तसेच कृषि विज्ञान केंद्र, कृषि तंत्र विद्यालय, कृषि महाविद्यालय व विभाग येथील शेती, उद्यानविद्या, पशुसंवर्धन निगडीत कामांकरिता अटी व शर्तींच्या अधीन राहून लागु राहतील. त्यानुसार सदर दर पुढीलप्रमाणे आहेत

अ) खरीप, रबी व उन्हाळी २०२६-२७ व २०२७-२८ करिता शेती निगडीत विविध कामे कंत्राटदाराकडून ट्रक्टरने/मळणी यंत्राने/ पंपाने/हार्वेस्टरने /बैलजोडीने करण्याकरिता मागविलेल्या दराचे विविरण

अक्र	कामाचे विवरण	प्रकार	दर रु. प्रति हेक्टर
१	ट्रॅक्टर ने नांगरणी (४५ सेमी)	२ फाळ	३९००/-
२	ट्रॅक्टर ने नांगरणी (४५ सेमी)	३ फाळ	३४३०/-

३	ट्रॅक्टर ने नांगरणी (४५ सेमी)	३ फाळ पलटी नांगर	२२००/-
४	ट्रॅक्टर ने पंजीवाही (३० सेमी)	५ फाळ	१८००/-
५	ट्रॅक्टर ने तीर्हीवाही (३० सेमी)	३ फाळ	१७००/-
६	ट्रॅक्टर ने फंटावाही (२० ते २५ सेमी)	९ दाती	१७००/-
७	ट्रॅक्टर ने पासावाही	३ पासा	१६००/-
८	ट्रॅक्टर ने पट्टीपास	जांभूळवाही	१५००/-
९	ट्रॅक्टर ने रोटाव्हेटर (L 2 २० ते २५ सेमी)	५ फुट लांब	२३१०/-
१०	सब सॉयलर (पटाशीचा नांगर) (२ ते २.५ फुट)		३०००/-
११	ट्रॅक्टर ने साऱ्या पाडणे	सरी यंत्राद्वारे	२०००/-
१२	ट्रॅक्टर ने जमीन सपाटीकरण करणे (१ मी अंतरावर)	सपाटीकरण यंत्राद्वारे	६९०/तास
१३	ट्रॅक्टर ने काकर पाडणे (१२ ते १५ सेमी)	४५ सेंमी अंतरावर	१८९०/-
		६० सेंमी अंतरावर	१९१०/-
		९० सेंमी अंतरावर	१८००/-
		१२० सेंमी अंतरावर	१८००/-
		१५० सेंमी अंतरावर	१९५०/-
१४	ट्रॅक्टर ने पेरणी (सोयाबीन, मुंग, उडीद, तूर, कापूस, तिळ, ज्वारी, मका, ज्यूट, धैंचा, बोरू, पौष्टिक तृण धान्य, हरभरा, मोहरी, करडी, जवस, कराड, गहू , भुईमुग ई. पिके)	साधे पेरणीयंत्र पट्टीपास सह	१९५०/-
		पेरणीयंत्र विना पट्टीपास	१९००/-
		बिबिएफ पेरणी यंत्राद्वारे पट्टीपास सह	२१००/-
		बिबिएफ पेरणी यंत्राद्वारे विना पट्टीपास	२०५०/-
१५	ट्रॅक्टर ने पेरणी तणनाशक फवारणी सह		९००/-
१६	ट्रॅक्टर ने फवारणी (बूम स्प्रेअर सह)	सोयाबीन, मुंग, उडीद, तूर, कापूस, तिळ, ज्वारी, मका, ज्यूट, धैंचा, बोरू, पौष्टिक तृण धान्य, हरभरा, मोहरी, करडी, जवस, कराड, गहू, भुईमुग ई. पिके	९००/-
१७	ड्रोन ने फवारणी	सोयाबीन, मुंग, उडीद, तूर, कापूस, तिळ, ज्वारी, मका, ज्यूट, धैंचा, बोरू, पौष्टिक तृण धान्य, हरभरा, मोहरी, करडी, जवस, कराड, गहू, भुईमुग ई. पिके	१४१०/-
			७००/तास
१८	ट्रॅक्टर ने दांड पाडणे	६० x ३० सेमी (रुंदी x खोली)	१२००/ तास
१९	ट्रॅक्टर ने स्लॅशर मारणे	शेतामध्ये	१२००/-
		रस्त्यालगत व धुऱ्यावर	४००/तास
२०	ट्रॅक्टर ने डवरणी	४५ सेंमी अंतर	१९००/-
		६० सेंमी अंतर	१९००/-
		९० सेंमी अंतर	१९००/-
		१२० सेंमी अंतर	१९००/-
		१५० सेंमी अंतर	१९००/-
२१	पाणी ट्रॅक्टर सह टँकरने पाणी पुरविणे	५००० ली. क्षमता	१८००/टँकर
२२	ट्रॅक्टर व टँकर सह ओलीत करणे		२८००/-
२३	यंत्राद्वारे रासायनिक खत फेकणे		३००/क्विंटल
२४	यंत्राद्वारे काशा /धसकटे/ काडी कचरा जमा करणे		२०००/-
२५	**मळणी यंत्राद्वारे पिकांची मळणी करणे**		
	सोयाबीन — पिडीकेव्ही सुवर्ण सोया	३५० ते ४५० RPM	३३०/क्विंटल
	सोयाबीन — पिडीकेव्ही अंबा	३५० ते ४५० RPM	३१०/क्विंटल
	मुंग		३५०/क्विंटल
	उडीद		३५०/क्विंटल

	तूर		४५० ते ५५० RPM	४००/क्विंटल
	हरभरा			३००/क्विंटल
	करडी			३५०/क्विंटल
	मोहरी			३५०/क्विंटल
	गहू			३००/क्विंटल
	ज्वारी			३००/क्विंटल
	मका			३५०/क्विंटल
	पौष्टिक तृण धान्य			३५०/क्विंटल
	धैंचा			३५०/क्विंटल
	बोरू			३५०/क्विंटल
	ज्यूट			३००/क्विंटल
	जवस			३००/क्विंटल
२६	**कम्बाईन हार्वेस्टरने पिकांची कापणी व मळणी**			
	सोयाबीन	पिडीकेव्ही सुवर्ण सोया	३५० ते ४५० RPM	४३००/-
		पिडीकेव्ही अंबा	३५० ते ४५० RPM	४२००/-
	मुंग			३०००/-
	उडीद			४०००/-
	तूर		४५० ते ५५० RPM	४०००/-
	हरभरा			३५००/-
	करडी			३२००/-
	मोहरी			३९००/-
	गहू			४१००/-
	ज्वारी			४१००/-
	मका			३९००/-
	पौष्टिक तृण धान्य			४०००/-
	धैंचा			४५००/-
	बोरू			४५००/-
	ज्यूट			४९००/-
	जवस			४५००/-
२७	**रिपर हार्वेस्टरने पिकांची कापणी करणे, जमा करणे व खळ्यावर गंजी लावणे**			
	सोयाबीन			५९००/-
	मुंग			५९००/-
	उडीद			६०००/-
	तूर			६०००/-
	हरभरा			५९००/-
	करडी			५९००/-
	मोहरी			५६००/-
	गहू			५४००/-
	ज्वारी			५३००/-
	मका			६०००/-
	पौष्टिक तृण धान्य			७०००/-
	धैंचा			७०००/-
	बोरू			७०००/-
	ज्यूट			७०००/-
	जवस			७०००/-

बैलजोडीचे कामाचे दर (बैलजोडी, औजारे व मजूरासह)			
२८	पिकांची पेरणी करणे सोयाबीन, मुंग, उडीद, तिळ, ज्वारी, मका, ज्यूट, धैंचा, बोरू, पौष्टिक तृण धान्य, हरभरा, मोहरी, करडी, जवस, कराड, गहू , भुईमुग	४५ सेंमी	२५००/-
		६० सेंमी	२३००/-
	कापूस, तूर	९० सेंमी	२३००/-
२९	सरत्याद्वारे पिकांना वरखत देणे		१५००/-
३०	काकर पाडणे	३० सेंमी	२२००/-
		४५ सेंमी	२०००/-
		६० सेंमी	२०००/-
		९० सेंमी	१९००/-
		१२० सेंमी	१९००/-
		१५० सेंमी	१८००/-
३१	चौफुली पाडणे	४५ x ४५ सेंमी	२१००/-
		६० x ६० सेंमी	२१००/-
		६० x ९० सेंमी	२१००/-
३२	डवरणी करणे	३० सेंमी	२४९०/-
		४५ सेंमी	२४००/-
		६० सेंमी	२४००/-
३३	वखरणी करणे	९० सेंमी	२२००/-
		१२० सेंमी	२२००/-
		१५० सेंमी	२२००/-
३४	पाण्यासाठी दांड तयार करणे व माती ओढणे	६० x ३० सेमी (रुंदी x खोली)	१५००/-
३५	ट्रॅक्टर ने डिस्क वखरणी		२५००/-
३६	ट्रॅक्टर ने लेव्हलींग/ सपाटीकरण करणे		३५००/-
३७	ट्रॅक्टर ट्रॉलीने वाहतूक करणे (५ किमी पर्यंत)	कापलेले गवत, निलगीरी पाला, इंधन, हळद बेणे, रोपांच्या पिशव्या, झाडांच्या कुंड्या ई.	९५६/ट्रीप

ब) खरीप, रबी व उन्हाळी हंगाम २०२६-२७ व २०२७-२८ मध्ये शेती निगडीत विविध कामे कंत्राटदाराकडून कंत्राटी पद्धतीने मजुरांकडून करण्याकरिता मागविलेल्या दराचे विविरण

अ.क्र.	कामाचे विवरण	प्रकार		दर रु.
१	काशा /धसकटे/ काडी कचरा वेचणे	मजुराद्वारे		२२००/-
२	शेणखत भरणे /उतरविणे/ वाहतूक करणे	वाहन व मजुरासह	० ते ५ कि.मी.	१९००/टन
			६ ते १० कि.मी.	२२००/टन
३	शेणखत पसरविणे	मजुराद्वारे	५ टन प्रति हेक्टर	२५००/-
		यंत्राद्वारे	५ टन प्रति हेक्टर	२०००/-
४	बियाण्यास बीज प्रक्रिया करणे			२००/क्विं
५	टोकन पद्धतीने पेरणी करणे	३० x ६० सेमी		३२००/-
		३० x ९० सेमी		३२००/-
		९० x १२० सेमी		३२००/-
		१२० x १५० सेमी		३०००/-

६	विरळणी करणे	३० x ६० सेमी		२२००/-
		३० x ९० सेमी		२२००/-
		९० x १२० सेमी		२२००/-
		१२० x १५० सेमी		२२००/-
७	खुरपणी / निंदण करणे			
	खरीप	सोयाबीन, ज्वारी, तीळ, मुंग, उडीद, ज्यूट, बोरू, धैंचा, कराड, पौष्टिक तृणधान्य, मका, भुईमुग, सुर्यफुल, हळद व इतर पिके		५६००/-
		कापूस, तूर		५३००/-
	रब्बी	हरभरा, करडी, जवस, मोहरी, ज्वारी, मका		४९००/-
	उन्हाळी	तीळ, भुईमुग		३५००/-
८	वरखत देणे	बांगडी पद्धतीने		१५००/-
		हाताने टाकणे		१४००/-
९	कीटकनाशक, तणनाशक, बुरशीनाशक, सूक्ष्मअन्नद्रव्य, फवारणी करणे	पॉवर स्प्रे पंप	इंधन, पंप व मजुराद्वारे पाणी पुरविण्यासह	९००/-
		पॉवर स्प्रे /बॅटरी ऑपरेटेड पंप		७०/पंप
१०	पिकाला पाणी देणे			
	पट पाणी पद्धत			२०००/-
	तुषार सिंचन (स्प्रिंकलर पद्धतीने)	कार्यालयाचे डीझेल इंजिन/ विद्युत पंप / पाणबुडी तुषार सिंचन संच		२२००/-
		डीझेल, इंजिन, तुषार संच व मजुरासह (५ तास एक पाळी, १६ ते ४० नोझल व पाळी बदलतांना ओव्हरलॅपिंग पद्धतीने करणे बंधनकारक राहील)		६५००/-
		विद्युत पंप/पाणबुडी तुषार संच व मजुरासह (५ तास एक पाळी, १६ ते ४० नोझल व पाळी बदलतांना ओव्हरलॅपिंग पद्धतीने करणे बंधनकारक राहील)		१८६०/-
११	पिक काढणी / कापणी करणे (सर्व साहित्य आणि गंजी खाली व झाकण्याकरिता ताडपत्रीसह)	मुगाच्या शेंगा तोडणे, शेंगा बडवीने, उपनने व पोते भरणे		७५००/-
		सोयाबीन, उडीद कापणे व खळयावर जमा करणे		९०००/-
		ज्वारी, मका , बाजरी कापणी व बांधणी, कणीस खुडणे व खळयावर जमा करणे		९८००/-
		गहू कापणे व बांधणे, खळयावर जमा करणे		५०००/-
		तूर कापणी व बांधणी, जमा करणे, बडवणे, व उपनने व पोते भरणे		८५००/-
		भुईमुग काढणी, शेंगा तोडणी व पिक जमा करणे		८५००/-
		हरभरा कापणे, गोळा करणे व गंजी लावणे		९०००/-
		सुर्यफुल, जवस, तीळ, मोहरी, कराळ, ओवा काढणे व गोळा करणे बडविणे, उपणने व पोते भरणे		८०००/-
		करडी कापणे, गोळा करणे व गंजी लावणे		८०००/-
		पौष्टिक तृण धान्य कापणे, गोळा करणे व गंजी लावणे		६९००/-
		बोरू, धैंचा, ज्यूट कापणे, गोळा करणे व गंजी लावणे		७२००/-
		हळद पिकाचे बेने खळयावर जमा करणे		१००००/-
१२	बैल चारणे, राखणे व शेण काढणे	१० जनावर पर्यंत		५००/दिवस
१३	कडबा रचणे	१००० पेंड्या पर्यंत		१७००/१००० पेंड्या
१४	कापूस वेचणे			१५/किलो
१५	कापूस बोजा भरणे	बोजा भरणे (२ क्विंटल)		१००/बोजा

१६	ऊस / हळद	सऱ्या तोडणे, घोळणे, ऊस लागवड, / टिपऱ्या तयार करणे	१४०००/-
१७	पाण्यासाठी दांड तयार करणे		१२००/-
१८	अडान काढणे / उपटणे		३५००/-
१९	तूर पिक खुडणे/छाटणी करणे		२०००/-
२०	बिजोत्पादन पिकातील भेसळ काढणे		२५००/-
२१	ऊस	कापणी, बांधणी गंजी लावणे	१२००/टन
२२	प्रक्षेत्रावरील पिक राखणे (सर्व साहित्यासह उदा. गमबूट, शिटी, काठी, टॉर्च, रेन कोट, झटकामशिन, खुंट्या, दोरी, तार, मौचेसह व ई.)	१० हेक्टर प्रती दिवस [२४ तासाकरिता तीन शिफ्ट (८ तासाची एक शिफ्ट) व तीन राखणदार. तीन राखणदार न आढळल्यास प्रती राखणदाराप्रमाणे देयक काढण्यात येईल)	२८५०/१० हेक्टर/दिवस
२३	चेन सॉ/ चेन कटरने झाडांची छाटणी करणे	चेन सॉ/ चेन कटर व आवश्यक साहित्यासह	९००/दिवस

क) सन २०२६-२७ व २०२७-२८ मध्ये बियाणे प्रक्रिया केंद्र व भांडार विभागातील कामे करण्याकरिता मागविलेल्या दराचे विविरण

अ.क्र.	करावयाचे कामे	तपशील	दर रु. क्विंटल
१	सर्व प्रकारची बियाणे स्वच्छ करणे- बियाणे चाळणी करणे, वजन करणे	माजुराद्वारे चाळणी करून वजन करणे/स्पायरल	१००/-
२	बियाणे लोडिंग व अनलोडिंग करणे	३० किलो बॅग	१०/बॅग
		५० किलो बॅग	१७/बॅग
		१०० किलो बॅग	३४/बॅग
३	वाहनाने विभागावरून मळणी केलेले बियाणे आणणे व भांडार विभागात ठेवणे **५ किमी पर्यंत**	वाहन, वाहन चालक, लोडिंग व अनलोडिंगसह	५०/-
४	वाहनाने विभागावरून मळणी केलेले बियाणे आणणे व भांडार विभागात ठेवणे **६ ते १० किमी पर्यंत**	वाहन, वाहन चालक, लोडिंग व अनलोडिंगसह	६०/-
५	वाहनाने भांडार विभाग येथून बाजार समिती अकोला येथे नेणे **११ ते २० किमी पर्यंत**	वाहन, वाहन चालक, लोडिंग व अनलोडिंगसह	८०/-
६	वाहनाने भांडार विभाग येथून बाजार समिती अकोला येथे नेणे **२१ ते ३० किमी पर्यंत**	वाहन, वाहन चालक, लोडिंग व अनलोडिंगसह	१००/-
७	बियाणे प्रक्रीयाची कामे	बियाणे प्रक्रिया, पॅकींग, टॅगिंग व प्रक्रिया केलेल्या बियाण्याची लोडिंग व अनलोडिंग करणे (पोत्याची थप्पी लावणे) [वाहन, वाहन चालकसह]	१२०/-
८	कपाशी जिनिंग करणे		१२०/-
९	कापूस व सरकी स्वच्छ करणे		१५०/-
१०	भुईमुगाच्या शेंगा फोडणे व साफ करणे		१५०/-

ड) सन २०२६-२७ व २०२७-२८ मध्ये फळबागेतील विविध कामे करण्याकरिता मागविलेल्या दराचे विविरण

अ.क्र.	करावयाची कामे	तपशील	दर रु.
१.	फळ लागवडीसाठी गड्डे करणे	१ x १ फुट	१०/गड्डा
		२ x २ फुट	२०/गड्डा
		३ x ३ फुट	२५/गड्डा
	फळ लागवडीसाठी JCB द्वारे गड्डे करणे	१ x १ फुट	२०/गड्डा
		२ x २ फुट	३०/गड्डा
		३ x ३ फुट	४०/गड्डा
२.	फळबाग आखणी करणे (सर्व आवश्यक साहित्य व मनुष्यबळासह)		१०००/हेक्टर
३.	रोप लावणे व गड्डे भरणे	२ फुट	१५/रोप
४.	गादी वाफे तयार करणे		१५०/चौ. मीटर
५.	प्लास्टिक आच्छादन करणे	९० ते १२० रुंद	१००/मीटर
६.	फळ झाडांची छाटणी करणे	१ वर्षापर्यंत	२/झाड
		२ ते ३ वर्षापर्यंत	१०/झाड
		४ ते ५ वर्षापर्यंत	२०/झाड
		६ ते ७ वर्षापर्यंत	३०/झाड
		७ वर्षापुढील	३५/झाड
७.	ट्रक्टरच्या सहाय्याने फवारणी करणे (कीटकनाशक / तणनाशक / बुरशीनाशक / सूक्ष्म अन्नद्रव्य)	बूम स्प्रयेर व आवश्यक मनुष्यबळासह	८००/हेक्टर
८.	पाठीवरच्या पावर स्प्रे ने फवारणी करणे (कीटकनाशक / तणनाशक / बुरशीनाशक / सूक्ष्म अन्नद्रव्य)	आवश्यक मनुष्यबळासह	८००/हेक्टर
			४०/पंप
९.	फळ झाडांना बोर्डो मिश्रण लावणे	२ ते ५ वर्षापर्यंतचे झाड	७/झाड
		६ वर्षे व त्यावरील झाड	७/झाड
१०.	फळ बागेला खते देणे (रासायनिक / सेंद्रिय)		७/झाड
११.	फळ झाडांना आळे करणे		३०/आळे
१२.	फळ झाडांच्या आळेची उखरी करणे		८००/हेक्टर
१३.	फळबागे मध्ये निंदन / खुरपणी करणे		१८००/हेक्टर
	फळबागेतील बेड मध्ये निंदन / खुरपणी करणे	३ x ३ मी	२००/बेड
१४.	ब्रश कटरने फळबागे मधील बेड वरचे गवत कापणे		२५/चौ. मी.
१५.	ब्रश कटरने बांधावरचे गवत कापणे		२०/चौ. मी.
१६.	फळ बागेची रखवाली / चौकीदारी करणे (उदा. गम बूट, शिट्टी, टार्च, मौच्या, ईत्यादी)	१० हे (२४ तासाकरिता तीन शिफ्ट)	२६००/१० हेक्टर/दिवस
१७.	फळ बागेला दांड पद्धतीने पाणी देणे		८००/हेक्टर
१८.	फळ बागेला ड्रीपने पाणी देणे व व्यवस्थापन (ड्रीपच्या नळ्या जोडणे, सर्व ड्रीपर व्यवस्थित सुरु असल्याचे तपासणे, लॅटरल चे जॉइंट तपासणे, प्रेशर तपासणे तसेच ड्रीप संबंधी सर्व व्यस्थापन करणे.)		१०००/१० हेक्टर/दिवस
१९.	फळबागेमध्ये रोटाव्हेटर करणे		२३००/ हेक्टर

२०.	फळबागेत ९ दाती फंटावाही करणे		१७००/हेक्टर
२१.	फळबागेत पंजीवाही करणे		१५००/हेक्टर
२२.	फळबागेत नागरणी करणे (दोन फाळ)		३२००/हेक्टर
२३.	फळबागेत नागरणी करणे (तीन फाळ)		२९००/हेक्टर
२४.	फळबागे मधील विविध फळ झाडांचे ग्राफ्टिंग, बडींग कलम बांधणे व कटिंग करणे		६/झाड
२५.	विविध फळ कलमांची बॅग भरणे बियाणेसह	२ x ३ इंच	४/बॅग
		४ x ६ इंच	५/बॅग
		६ x ९ इंच	६/बॅग
		८ x १२ इंच	१०/बॅग
२६.	फळबाग नर्सरी संबंधी विविध कामे करणे		४९०/मजूर /८ तास

इ) सन २०२६-२७ व २०२७-२८ मध्ये कर्मशाळा विभागातील शेती निगडीत विविध कामे करण्याकरिता मागविलेल्या दराचे विविरण

अ.क्र.	करावयाची कामे	तपशील	दर रु.
१.	ट्रॅक्टर, जीप, मिनी ट्रक, पिकअप, ट्रक व इतर वाहने दुरुस्ती करणे	प्रति मजूर / ८ तास	८००/-
२.	मेकॅनिक व वेल्डर यांचे वाहने, कृषि औजारे, यंत्र इत्यादी दुरुस्ती कामामध्ये मदत करणे	प्रति मजूर / ८ तास	७००/-
३.	वाहन, कृषी औजारे ई. चे वेल्डिंग कामे तसेच कृषी औजारे व यंत्रे इत्यादींचे दुरुस्तीची कामे	प्रति मजूर / ८ तास	६९०/-
४.	वाहनांची पंचर दुरुस्ती	प्रति मजूर / ८ तास	६००/-
५.	शेती निगडीत वाहन चालविणे (पिकअप, मिनी ट्रक ई.)	प्रति मजूर / ८ तास	७००/-
६.	ट्रॅक्टरने शेती संबंधित तीनही हंगामातील कामे करणे (ट्रॅक्टर चालक)	प्रति मजूर / ८ तास	७००/-
७.	जेसीबी चालक / ऑपरेटर	प्रति मजूर / ८ तास	१०००/-
८.	कुशल मजूर	प्रति मजूर / ८ तास	५९०/-
९	अकुशल मजूर	प्रति मजूर / ८ तास	४९०/-
१०	शेती निगडीत कामे करण्याकरिता	प्रति मजूर / ८ तास	४९०/-
११	बीज प्रक्रिया मशीन ओपरेटर	प्रति मजूर / ८ तास	६००/-
१२	प्लंबिंग ची कामे करणे (पाईप लाईन, तुषार संच ई. प्लंबिंग कामे)	प्रति मजूर / ८ तास	८००/-
१३.	इलेक्ट्रिक व इलेक्ट्रॉनिक कामे करणे (विद्युत मोटर दुरुस्ती, विद्युत फिटिंग वायरिंग करणे ई. कामे)	प्रति मजूर / ८ तास	८००/-

उ) सन २०२६-२७ व २०२७-२८ मध्ये पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागातील विविध कामे करण्याकरिता मागविलेल्या दराचे विविरण

अ.क्र.	करावयाची कामे	तपशील	दर रु.
१.	गाय, म्हैस, बैल इत्यादी जनावरांची देखरेख (विद्यापीठ प्रक्षेत्रावर जनावरे चारावयास नेणे, दुधाळ जनावरे गोठ्यात बांधणे, चारा टाकणे ई.)	५० जनावरांचे प्रमाणात	५९०/दिवस
२.	गोठ्यातील शेण काढणे व चारा पाणी करणे (गोठ्यातील शेण काढणे व गोठ्याची स्वच्छता करणे, दुग्धशाळेतील साफसफाई करणे, पाण्याची टाकी साफसफाई व दुग्धशाळेतील जनावरांचे चारा पाणी करणे, कुट्टी करणे)	दोन वेळा (सकाळ व संध्याकाळ)	५९०/दिवस
३.	राखण करणे व दुग्धशाळेतील जनावरांची देखभाल	चौकीदारी करणे, रात्री जनावरांची काळजी घेणे, देखभाल करणे ई. कामे	४९०/दिवस
४.	गाय/म्हैस सकाळ व सायंकाळ दूध काढणे (दुग्धदोहन करणे, दुधाळ जनावरांना पशुखाद्य टाकणे व चारा-पाणी करणे, गोठा धुणे ई. कामे)	सकाळी ६.०० ते ७.३० सायंकाळी ४.०० ते ५.३० २० ते ३० दुधाळ गाई/म्हशीचे प्रमाणात	६/लिटर
५.	वासरांची देखरेख व चारा पाणी करणे (प्रक्षेत्रावर चारणे, चारा पाणी करणे, वासरांच्या गोठ्यातील शेण काढणे, गोठे साफसफाई, पशुखाद्य देणे, इत्यादी)	२५ ते ३० जनावरांचे प्रमाणात	५९०/दिवस
६.	शेळी देखरेख (गोठ्याची साफसफाई करणे, करडांचे गोठे साफ करणे, व्यवस्थापन करणे, करडांना दूध पाजणे, चराई करणे ई.)	६० शेळीचे प्रमाणात	५९०/दिवस
७.	कुक्कुटपालन देखरेख (कोंबडी पक्षांना दाणा पाणी करणे, अंडी गोळा करणे, राखण करणे, कुक्कुटपालन गृह साफसफाई, भांडे स्वच्छ करणे, पक्षांची योग्य काळजी घेणे इ.)	३०० पक्षीचे प्रमाणात	५९०/दिवस
८.	वैरण प्रक्षेत्रावर - चारा कापणी मका, ज्वारी, कडवळ, लुसर्ण, बरसीम, दशरथ, हायब्रीड नेपिअर इ.	प्रक्षेत्रावर हिरवा चारा कापणे व उचलून दुग्धशाळेमध्ये आणणे, कुट्टी करणे तसेच वैरण प्रक्षेत्रावरील विविध कामे करणे	४९०/दिवस
९.	कडबा बांधणी (५ ते ७ किलोची पेंढी), १५० ते २०० पेंढ्या ट्रॅक्टर ट्रॉलीत भरणे व डेअरीवर रिकामे करणे	५ कि.मी. पर्यंत (ट्रक्टर व ट्रोली कार्यालयाची राहील)	१२०/प्रति क्विंटल
१०.	सोयाबीन/मुंग/उडीद/तूर/हरभरा ई. कुटार ट्रॅक्टर ट्रॉलीत भरणे व डेअरीवर उतरविणे	५ कि.मी. पर्यंत (ट्रक्टर व ट्रोली कार्यालयाची राहील)	१५०/प्रति क्विंटल
११.	सोयाबीन/मुंग/उडीद/तूर/हरभरा ई. कुटार ट्रॅक्टर ट्रॉलीत भरणे व डेअरीवर उतरविणे	५ कि.मी. पर्यंत (वाहन, वाहन चालक व मजुरांसह)	२००/क्विंटल
१२.	संकरीत नेपिअरची थोबे/कांड्या कापणे व तुकडे करून मोजून गाडीत भरून देणे	वाहन किंवा ट्रक्टर व ट्रोली कार्यालयाची राहील	१०००/१००० थोंब
१३.	चारा पिकांना पाणी देणे	संकरीत नेपिअर बाजरा, लुसर्ण, बरसीम, मका, ज्वारी इ. चारा पिके	९५०/हेक्टर
१४.	मुरघास करिता चारा कापणी (वैरण प्रक्षेत्रावरील चारा कापणे, बांधणे व विभागावरील ट्रक्टरने मुरघास खड्यापर्यंत किंवा डेअरीमध्ये पोहचविणे ई. कामे)	मका, ज्वारी, बाजरा, हायब्रीड नेपिअर ई. चारा पिके	३५००/हेक्टर
१५.	मुरघास तयार करणे	हिरव्या चा-याची चाफ कटरने कुट्टी करणे, मुरघास खड्यामध्ये पसरविणे, दबाई करणे, प्रक्रिया करणे ई. कामे	३०००/हेक्टर

१६.	जनावरांचे आरोग्य व्यवस्थापन करणे	पशुवैद्यक यांच्या मार्गदर्शनाखाली पशुधन पर्यवेक्षक म्हणून जनावरांचे औषधोपचार, कृत्रिम रेतन, गाभण गाई तपासणी, लसीकरण, कृमीनाशक औषधी देणे, इंजेक्शन लावणे, ई. कामे करणे	७००/दिवस
१७.	संकरीत नेपिअर लागवड करणे	प्रक्षेत्रावरील संकरीत नेपिअर थोंबे काढणे व नेमून दिलेल्या प्रक्षेत्रावर थोंबे लागवड करणे	१२००/हेक्टर
१८.	गांडूळखत व्यवस्थापन (दैनंदिन कामे)	गांडूळखत बेड ला पाणी देणे, साफसफाई करणे, पोते शिवणे, पोते भरणे, गांडूळ व्यवस्थापन, दररोज गांडूळखत विक्री करणे ई. कामे	५९०/दिवस
१९.	गांडूळखता करिता पॉली बेड भरणे (मुक्त संचार गोठ्यातील अर्धवट कुजलेले शेणखत, पाला पाचोळा, गव्हाणीतील उरलेले कुटार ई. थरावर थर देवून भरणे)	१२ x ४ x २ फुट आकाराच्या पॉली बग (अंदाजित १ टन १ बेड)	३५०/ पॉली बेड
२०.	गांडूळखता करिता सपाट जमिनीवर हिप बेड लावणे (जमिनीवर मुक्त संचार गोठ्यातील अर्धवट कुजलेले शेणखत, पालापाचोळा, गव्हाणीतील उरलेले कुटार ई. थरावर थर देवून हिप बेड लावणे)	१२ x २.५ x २ फुट अशा आकारमानाचे	१००/हिप बेड
२१.	गांडूळखत गाळणे	गाळण यंत्रात बेडवरील तयार झालेले खत टाकून गांडूळखत गाळून देणे	१/किलो
२२.	शेणखत वाहतूक (गांडूळखत बेड भरणेकरिता मुक्त संचार गोठ्यातील अर्धवट कुजलेले शेणखत उचलून ट्रॅक्टर ट्रॉलीत भरणे व गांडूळखत युनिट येथे उतरविणे)	ट्रॅक्टर, ट्रॅक्टर ट्रॉली, ट्रॅक्टर चालक व मजुरांसह	२५००/ट्रीप
२३.	जे. सी. बी. मशीन द्वारे मुक्त संचार गोठ्यातील शेणखत जमा करणे, उचलून ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये भरणे व गांडूळखत युनिट येथे खाली करणे	ट्रॅक्टर ट्रॉली कार्यालयाची राहील	८००/तास

अटी व शर्ती

१. कंत्राटदाराकडे संबधित कामाचा वैध परवाना (Labour License) असणे बंधनकारक आहे. सदर परवाना (Labour License) निविदा सादर करण्याच्या दिनांकास वैध व अद्ययावत असणे आवश्यक राहील. परवाना (Labour License) मध्ये नमूद केलेली कामगार संख्या निविदेमधील कामांचे आवश्यक मनुष्यबळ क्षमतेनुसार असणे आवश्यक राहील.

२. विद्यापीठाचे कार्यक्षेत्र विदर्भ प्रदेश असल्यामुळे निविदाकाराकडे विदर्भातील जिल्ह्यांचे स्थानिक महाराष्ट्र कामगार आयुक्त कार्यालय यांचे कडील कामगार परवाना (Labour Licence) असल्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

३. भागीदारी फर्म असल्यास भागीदारी संहिता प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे.

४. सदर चे काम हे संबंधित प्रक्षेत्रावरील /विभागावरील प्रभारी अधिकारी यांचे नियंत्रणाखाली करावे लागेल व त्यांनी दिलेल्या संबंधित क्षेत्रातील स्थळांनुसार करावे लागेल.

५. विभागाचे क्षेत्रानुसार कामाचे परिमाण कमी किंवा जास्त करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत व त्यानुसारच कार्यारंभ आदेश देण्यात येतील.

६. महाराष्ट्र शासनाचे कामगार विषयक नियमांचे व कायद्याचे पालन (कामगार कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण ESIC, भविष्य निर्वाह निधी EPF, व्यवसायिक कर PT, MLWB, कशलेस पद्धतीचा अवलंब ई.) करण्याची व वेळोवेळी शासन निर्णयानुसार संबंधितास देय लाभ देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील. सदर बाब काही तंटा निर्माण झाल्यास कार्यालय हस्तक्षेप करणार नाही अथवा कोणतीही जबाबदारी संबंधित विभागाची अथवा या कार्यालयाची अथवा विद्यापीठाची राहणार नाही.

७. कंत्राटदाराने महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटी कामगार किमान वेतन कायद्यानुसार आवश्यक ते सर्व अभिलेख उदा. हजेरी नोंद, वेतन वाटप नोंद, दैनंदिन कामाच्या नोंदी इत्यादी नोंद वह्या ठेवणे व ते सबंधित प्राधिकरणाद्वारे तपासून घेणे बंधनकारक असून त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

८. कामगारच्या वैयक्तिक खात्यावर वेतन, EPF, विमा, व्यवसायिक कर व इतर भरणा केलेल्याचे चलान/पावती पुढील देयक सादर करतेवेळी देयकासह सादर करणे बंधनकारक राहील.

९. ई निविदामधील संबंधित कामे कत्रांट पद्धतीने करण्याचे दर नियमाप्रमाणे सर्व करासह नमूद करण्यात यावे तसेच त्या कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबधित निविदाधारकाची राहील. करा सबंधी कोणतीही तक्रार असल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१०. कंत्राट पद्धतीने प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम, संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच बीजप्रक्रिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या स्त्री/पुरुष मजुरांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

११. मध्यवर्ती संशोधन केंद्र, अकोला व मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वाणी रंभापूर अंतर्गत संपूर्ण विभागाचे प्रक्षेत्रावरील बिजोत्पादन कार्यक्रम, संशोधन प्रयोग संबंधित कामे करीत असतांना पिकांचे/फळबागेचे तसेच विभाग व इतर विभाग संबधित तांत्रिक कामे करीत असतांना यंत्राचे/वाहनाचे/नवीन/सुट्टया भागांचे, विद्यापीठ मालमत्ता ई. नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबधित कंत्राट दाराकडून वसूल करण्यात येईल.

१२. प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन कार्यक्रम संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच बीजप्रक्रिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबंधित कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी झाल्यास किवा नैसर्गिक आपत्ती (प्राणी, वादळ, वीज, पाऊस ई.) मुळे इजा, अपघात अथवा मृत्यू संभाविल्यास त्याची भरपाई व इतर कायदेशीर जबाबदारी पूर्णतः संबंधित कंत्राटदाराची राहील. सदर बाब कुठलीही जबाबदारी संबंधित विभागाची अथवा या कार्यालयाची अथवा विद्यापीठाची राहणार नाही.

१३. प्रक्षेत्रावरील सदर कामे कोणत्याही परीस्थित दिलेल्या वेळेत/मुदतीत पूर्ण करणे बंधनकारक आहे. दिलेल्या मुदतीत कामे पूर्ण न केल्यास तसेच कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किवा काम अर्धवट राहिल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही व पूर्व सुचना/नोटीस न देता निविदा रद्द करण्यात येईल. संबंधित कंत्राटदरास विद्यापीठ प्रक्षेत्रावर पुढील कंत्राटांकरिता अपात्र ठरविण्यात येऊन काळ्या यादी मध्ये समाविष्ट करण्याकरिता विद्यापीठ प्रशासनाकडे शिफारस करण्यात येईल.

१४. प्रक्षेत्रावरील सदर कामे ज्या कंत्राटदारांचे नावे निविदा मंजूर होईल त्या मूळ कंत्राटदारांना काम करावे लागतील, परस्पर दुसऱ्या कंत्राटदारास कामे हस्तांतर करता येणार नाहीत. मात्र सदरहू कामे पूर्ण करून घेणेकरिता संबंधित विभागाला दुसऱ्या कंत्राटदाराची मदत घ्यावी लागल्यास त्याचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत.

१५. कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

१६. या कार्यालया तर्फे कंत्राटदारास बिजोत्पादन कार्यकम, संशोधन प्रयोग सबंधित कामे करण्याकरिता कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरविण्यात येणार नाही. सबंधित काम करण्याकरिता आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी सबंधित कंत्राटदाराची राहील.

१७. कंत्राटदारास बिजोत्पादन कार्यक्रम, संशोधन प्रयोग सबंधित कामाचे देयक काम पूर्ण व विहित वेळेत केल्यावर संचालक, मसकें, अकोला व मुख्य बिजोत्पादन अधिकारी, मप्राप्र, वाणी रंभापूर यांनी कामांची पाहणी केल्यानंतर तसेच संबधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक व गुणवत्तापूर्ण झाल्याचे प्रमाणित केल्यानंतर कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यावरच तसेच प्रत्यक्ष निधी उपलब्धतेनुसार कामाचे देयक पारित करण्यात येईल.

१८. वस्तु व सेवा कर (GST) २% व आयकर टीडीएस २% हे देयक रक्कमेवर कपात करण्यात येईल व संबंधित कंत्राटदारास सदर कर कपातीचा त्रैमासिक परतावा दाखल (quarterly return) करून सदर कराचा परतावा मिळवता येईल.

१९. प्रशासकीय व आर्थिक मंजुरीच्या अधीन राहून आवश्यकतेनुसार कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात येतील. तसेच अनुदान उपलब्धतेनुसार देयके अदा करण्यात येतील याची नोंद घेण्यात यावी. काही कारणास्तव कार्यालयाकडून विलंबाने देयक अदा झाले तरी प्रत्येक महिन्याचे पाच तारखेपर्यंत संबंधीत मजुरांना वेतन (बँक खात्यामध्ये) अदा करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२०. कामाचा आदेश मिळालेल्या कंत्राटदारास प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष काम सुरु असतांना काम सुरळीत चालण्याचे दृष्टीने कंत्राटदार स्वत; अथवा पूर्णवेळ पर्यवेक्षक नेमून कामाचा सतत पाठपुरावा व देखरेख करणे बंधनकारक राहील. हे कार्यालय किंवा संबंधित विभागाचे कर्मचारी त्यामध्ये गुंतून राहणार नाही तर सुरळीत व वेळेत काम पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी हि कंत्राटदाराची राहील.

२१. प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन कार्यक्रम, संशोधन प्रयोग संबधित कामे तसेच बीजप्रकिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबधित कामे करीत असतांना वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/मा. संशोधन संचालक, डॉ. पंदेकृवि, अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पंदेकृवि, अकोला यांचा राहील आणि तो सर्वाना मान्य करणे बंधनकारक राहील.

२२. बिजोत्पादन कार्यक्रम संशोधन प्रयोग संबधित कामे तसेच बीजप्रक्रिया केंद्र व वाहन विभाग संबधित तांत्रिक कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी हे १८ वर्षाच्या वर असावे तसेच ५८ वर्षापेक्षा कमी असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरिक दृष्ट्या सक्षम असावेत.

२३. संबंधित कंत्राटदाराकडे पुरेसे प्रशिक्षित, अनुभवी व तत्काळ उपलब्ध होणारे मनुष्यबळ असणे आवश्यक राहील. तसेच बीज प्रक्रिया केंद्रे, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबधित तांत्रिक कामे करण्यासठी पुरविण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्याकडे संबधित तांत्रिक कामाची पदविका/आयटीआय प्रमाणपत्र/ वाहन/ ट्रॅक्टर ई. चालविण्याचा परवाना व कामचा अनुभव असणे बंधनकारक राहील.

२४. प्रक्षेत्रावर यंत्र व औजारे सहाय्याने करण्यात येणाऱ्या कामांकरिता वापरण्यात येणारी यंत्रे व औजारे चांगल्या स्थितीत व चांगल्या दर्जाचे असणे आवश्यक राहील (उदा. ट्रॅक्टर, ट्रॉली, नांगर, रोटावेटर, पेरणी यंत्र, बुम स्प्रेयर ई.).

२५. ज्या विभागावर काम उपलब्ध असेल त्याच विभागावर काम करावे लागेल. तसेच ई-निविदा प्रक्रियेतील पात्र कंत्राटदार ई-निविदा मधील कामे करण्यास नकार देत असतील तर त्यांचे नाहरकत प्रमाणपत्र सादर करून नव्या कंत्राटदारामार्फत दस्तावेजाची पूर्तता करून कामे करुन घेण्यात येतील.

२६. एखादया कंत्राटी मजुरास कुठल्याही दिवशी कामावर हजर राहणे शक्य नसल्यास अशा परिस्थितीत पर्यायी व्यक्तीची व्यवस्था लावण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२७. सदर कामे हि पुर्णता बह्यस्त्रोता मार्फत कंत्राटी पद्धतीने करावयाची असल्याकारणाने मजुरांच्या जेष्ठता यादीत कामाची अथवा कामावरच्या हजेरीची नोंद होणार नाही व तसा कुठलाही दावा करता येणार नाही .

२८. समाधानकारक काम न आढळल्यास कंत्राटी कामगारास कामावर ठेवणे व काढून टाकणे याबाबत संबंधित विभागाचे अधिकारी यांनी कंत्राटदारास कळविल्यानंतर सदर कंत्राटी कामगारास कामावर ठेवणे अथवा काढून टाकण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. संबंधित कंत्राटदाराने उचित कार्यवाही न केल्यास सदर अधिकार संचालक, मसकें, अकोला व मुख्य बिजोत्पादन अधिकारी, मप्राप्र, वाणी रंभापूर यांनी राखून ठेवले आहेत.

२९. कंत्राटदाराने कामगारास ओळखपत्र व आवश्यक सुरक्षा साहीत्य उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील तसेच कामगारास साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक राहील याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३०. कामावर ठेवलेल्या मजुरांचे हजेरी पत्रक कामाच्या प्रत्येक ठिकाणी ठेवणे आवश्यक आहे. संबंधित कार्यालय प्रमुखास तसेच नियंत्रण अधिकाऱ्यास केंव्हाही हजेरिपत्रक तपासण्याचा अधिकार राहील.

३१. सर्व प्रक्षेत्रावरील कामे एकाच वेळेस आल्यास प्रक्षेत्रावरील कामे वेळेत होण्याच्या दृष्टीने व आवश्यकतेनुसार न्यूनतम देकार एल-१ नुसार एका पेक्षा अधिक पात्र कंत्राटदारास कामे विभागून (Split Work Order) देण्याचे अधिकार काम करून घेणाऱ्या संबंधित विद्यापीठातील अधिकारी यांना राहतील. एका पेक्षा अधिक पात्र कंत्राटदारास कामे विभागून (Split Work) देतांना कंत्राटदार/संस्थेची वार्षिक उलाढाल, शेती कामाचा अनुभव ई. विचारात घेण्यात येईल व स्थानिक कामगार परवाना (Labour Licence) असणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल.

३२. कंत्राटदारामार्फत प्रक्षेत्रावर काम करीत असलेल्या कुशल/अर्धकुशल/अकुशल स्त्री/पुरुष मजुरांना विद्यापीठ आस्थापनेवर नियमित सेवा मागण्याचा अथवा त्यासंबंधी न्यायालयीन प्रकरण दाखल करण्याचा अधिकार राहणार नाही. भविष्यत अशी परिस्थिति उद्भवणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३३. पिकांना पाणी देणे करिता कंत्राटदारांनी कार्यालयाचे तुषार संच (३० पाईप + १० नोझल) व एच डी पी व्ही पाईप (२०० मीटर पाईप) यांचा वापर केल्यास रु. ३००/- तुषार संच व एच डी पी व्ही पाईप करिता प्रति दिवस प्रमाणे दर आकारण्यात येईल. तसेच कर्मशाळा येथून यंत्रे वापरल्यास खालील प्रमाणे दर आकारण्यात येईल.

- अ) पेरणी यंत्र रु. २००/-प्रति दिवस
- आ) बीबीएफ पेरणी यंत्र रु. ५००/-प्रति दिवस
- इ) नांगर दोन फाळ रु. ३००/-प्रति दिवस
- ई) रोटावेटर रु. ५००/-प्रति दिवस
- उ) डिस्क प्लो रु. ५००/-प्रति दिवस
- ऊ) ट्रॅक्टर ट्रॉली रु. ५००/-प्रति दिवस

३४. पिक नुकसान भरपाई वसूल करण्याकरिता खालील बाबींचा समावेश असेल-

- अ) पिकाचे वाण व दर्जा
- ब) नुकसान झालेले पिकाखालील क्षेत्र
- क) पिकाचे वाण व दर्जा नुसार विद्यापीठ प्रशासनाने नेमून दिलेले बियाणे उत्पन्नाचे लक्षांक.
- ड) पिक वाण व दर्जा नुसार विद्यापीठ प्रशासनाने त्या वर्षाकरिता मंजूर केलेले बियाण्याचे दर नुकसान भरपाई बाबतीत विभागावरील पिकांचे बियाणे दर्जा नुसार येणारे अपेक्षित उत्पादन क्विंटल याप्रमाणे वसुली पात्र राहील.
- ढ) पिक राखणी/चौकीदारी दरम्यान प्रक्षेत्रावरील साधनसामुग्री/साहित्य यांचे नुकसान झाल्यास संबंधी कंत्राटदार नुकसान भरपाईस पात्र राहील.

३५. विभागावरून उत्पादित झालेल्या बियाण्याचे भांडार विभाग येथे कंत्राटदारामार्फात वाहनाने वाहतूक करतेवेळी धरम काट्यावर वजन करण्याचा खर्च प्रती क्विंटलप्रमाणे संबंधित कंत्राटदारास अदा करणे बंधनकारक राहील.

३६. सादर ई-निविदा प्रक्रियेबाबत कुठलेही न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास अधिकार क्षेत्र अकोला जिल्हा न्यायालय राहील.

३७. सदर ई-निविदा प्रक्रियेद्वारे निविदा मसुद्यामधील नमूद सर्व कामाचे कमीत कमी दर ठरविण्यात येतील. ई-निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर निविदेतील प्रशासकीय मंजुरी मिळालेल्या कामाच्या कमीत कमी दरानुसार इच्छुक कंत्राटदार/निविदाधारकास काम करणे बंधनकारक राहील.

३८. ई-निविदा भरणाऱ्या कंत्राटदाराकडे वैध डीजीटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (DSC) असणे आवश्यक आहे.

३९. प्रक्षेत्रावरील विभागावर बिजोत्पादन कार्यक्रम, संशोधन प्रयोग संबधित कामे तसेच बीजप्रकिया केंद्र, विकास विभाग, कर्मशाळा विभाग व इतर विभाग संबधित तांत्रिक कामे खरीप, रब्बी व उन्हाळी या तिन्ही हंगामा करिता असून कामाचे दर दोन वर्षाकरिता वैध राहतील.

४०. निविदा प्रक्रियेमध्ये निविदेवर तक्रार / हरकत अथवा कंत्राटदारावर आक्षेप अथवा निविदा प्रक्रिये नंतर पात्र कंत्राटदारावर आक्षेप घेणाऱ्या निविदाधारकास प्रथम ई- निविदा Earnest Money Deposit (EMD) एवढी रक्कम रुपये १,५०,०००/- (अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार फक्त) इतकी अनामत रक्कम लेखाधिकारी, मध्यवर्ती संशोधन केंद्र या नावे अकोला येथे देय (payable at Akola) डी.डी. स्वरुपात निम्न स्वाक्षरीत यांचे अथवा संबंधित कार्यालयाकडे जमा करणे आवश्यक राहील.

- तक्रार लेखी स्वरूपात आवश्यक पुरावे व कागदपत्रांसह सादर करणे बंधनकारक राहील. तक्रारीची पडताळणी संबंधित कार्यालयामार्फत करण्यात येईल.
- तक्रार प्रथमदर्शनी तथ्यपूर्ण आढळल्यास संबंधित तक्रारदाराची अनामत रक्कम परत करण्यात येईल व दोषी आढळलेल्या निविदाधारकास निविदा प्रक्रियेतून अपात्र घोषित करण्यात येईल. तसेच तक्रारीतील आरोप सिद्ध झाल्यास संबंधित निविदाधारकाची/अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
- तक्रार खोटी, दिशाभूल करणारी अथवा द्वेषभावनेतून केलेली आढळल्यास तक्रारदाराची संपूर्ण अनामत रक्कम शासन जमा करण्यात येईल.
- सदर अनामत रकमेवर कोणतेही व्याज, नुकसानभरपाई किंवा न्यायालयीन दावा ग्राह्य धरला जाणार नाही.
- तक्रार प्रकरणात संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला व मुख्य बिजोत्पादन अधिकारी, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापुर यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

४१. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या नियमांचे पालन करणे संबधित कंत्राटदारांना बंधनकारक राहील.

४२. निविदा मंजुर करणे, नामंजुर करणे, निलंबित व रद्द करणे, चर्चा, कामाची विभागणी करणे तसेच अटी व शर्ती मध्ये बदल करणे, निविदा उघडण्याचा दिनांक सोईनुसार पुढे ढकलणे इत्यादी संपूर्ण कामाचे अधिकार संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला व मुख्य बिजोत्पादन अधिकारी, मध्यवर्ती प्रत्याक्षित प्रक्षेत्र, वणी रंभापुर यांचे कडे राखून ठेवण्यात येत आहेत. त्यांचा निर्णय सर्व निविदाधारकांसाठी अंतिम व बंधनकारक राहील. तसेच कोणतेही कारण न सांगता संपूर्ण ई-निविदा अस्वीकृत करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यांकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

४३. ई-निविदा प्रक्रियेतील व वरील नमूद सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असल्याचे रु ५०० चे स्टंप पेपर वर करारनामा पात्र कंत्राटदरास संबंधित प्रक्षेत्रावर काम सुरु करण्यापूर्वी सादर करणे बंधनकारक राहील.

संशोधन संचालक
डॉ. पंदेकृवि, अकोला

प्रतिलिपी:-

१. मा. कुलसचिव, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना माहितीकरिता सादर.
२. मा. नियंत्रक, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना माहितीकरिता सादर.
३. मा. कुलगुरूंचे तांत्रिक सचिव यांना मा. कुलगुरू महोदय, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना माहितीकरिता सविनय सादर.
४. सर्व सहयोगी अधिष्ठाता, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना माहितीकरिता सादर.
५. मुख्य बिजोत्पादन अधिकारी, मप्राप्र, वणी रंभापूर यांना माहितीस व पुढील योग्य कार्यवाहीस.
६. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना माहितीस व पुढील योग्य कार्यवाहीस.
७. सर्व प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र यांना माहितीस व पुढील योग्य कार्यवाहीस.
८. सर्व कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र यांना माहितीस व पुढील योग्य कार्यवाहीस.
९. सर्व प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय यांना माहितीस व पुढील योग्य कार्यवाहीस.
१०. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती यंत्रणा कक्ष, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना विद्यापीठ संकेत स्थळावर व्यापक प्रसिद्धी देण्याकरिता सादर.